आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१८ सप्टेंबर २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- राज्यातल्या मोठ्या MIDC जवळ कामगांरासाठी सर्वसोयींनी युक्त निवास व्यवस्था तयार करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

- डिजिटल व्यक्तिगत डेटा संरक्षण कायद्याच्या अंतर्गत तयार करण्यात आलेले नवीन नियम केंद्र सरकार लवकरच जाहीर करणार

- युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या तात्पुरत्या यादीत महाबळेश्वर आणि पाचगणीसह भारतातल्या सात नवीन स्थळांचा समावेश

आणि

- जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भालाफेकपटू सचिन यादवचं कांस्यपदक हुकलं, नीरज चोप्रा आठव्या स्थानी

**<><><><>**

राज्यात मोठ्या औद्योगिक वसाहतींच्या ठिकाणी 'इंडस्ट्रियल टाऊनशिप' उभारण्यात याव्यात. या टाऊनशिप मध्ये संपूर्ण नागरी सुविधा देण्यात यावेत, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत घेतलेल्या बैठकीत दिले. उद्योगाच्या आजुबाजूलाच निवासाची सुविधा मिळाल्यास कामगारांची क्षमता वाढेल. शहरात, गावात मिळणारे सर्व अधिकार येथे राहणाऱ्या नागरिकांनाही मिळतील, याची व्यवस्था करावी, असं ते म्हणाले.

**<><><><>**

डिजिटल व्यक्तिगत डेटा संरक्षण नियमांचं काम अंतिम टप्प्यात आलं असून येत्या काही दिवसांतच ते प्रसिद्ध केले जातील, अशी माहिती केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दिली. एआय इम्पॅक्ट समिट २०२६चं बोधचिन्ह आणि महत्त्वाच्या उपकरणांच्या प्रकाशनाच्या वेळी ते बोलत होते. पुढच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात ही परिषद होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

देशात एआय मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळत असून विविध क्षेत्रांमध्ये एआय सुविधा पोहोचायला याद्वारे मदत होत असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

भारत आपल्या नागरिकांना बेकायदेशीर आणि बनावट व्यापारापासून संरक्षण देण्यासाठी वचनबद्ध असल्याचं केंद्रीय कायदा आणि न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली एका परिषदेत बोलत होते.

या सत्राला संबोधित करताना, कायदा आणि न्याय मंत्रालयाचे माजी सचिव पी के मल्होत्रा म्हणाले की, बेकायदेशीर व्यापार प्रगतीमध्ये अडथळा आणतो, खर्च वाढवतो आणि आपल्याला सामायिक विकास उद्दिष्टांपासून दूर नेतो. आपला देश २०४७ सालापर्यंत तीस ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याचं उद्दिष्ट ठेवत असून, बेकायदेशीर व्यापार या परिवर्तनकारी विकासात अडथळा निर्माण करतो, असं त्यांनी नमूद केलं.

<><><><>

ईपीएफओ अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेचे सदस्य आता एकाच लॉगिनच्या माध्यमातून सर्व सेवांचा लाभ घेऊ शकणार आहे. कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी ही माहिती दिली आहे. या बदलामुळे वापरकर्त्यांच्या तक्रारी कमी होतील, पारदर्शकता वाढेल आणि सदस्यांना सुविधांचा लाभही सुलभतेने मिळू शकेल. यापूर्वीच्या दुहेरी लॉगिन प्रणालीमुळे याला विलंब होत होता, तसंच पासवर्ड संबंधित अडचणीही वाढल्या होत्या. त्यामुळे आता ईपीएफओनं सदस्यांसाठी पासबुक लाईट ही सेवा सुरू केली असून याद्वारे सदस्यांना पीएफची रक्कम, पैसे काढणं सोयीचं होणार आहे.

<><><><>

सरकारी कर्मचाऱ्यांना एनपीएस ऐवजी युपीएसचा पर्याय निवडण्यासाठी ३० सप्टेंबरची मुदत केंद्र सरकारनं दिली आहे. भविष्यात युपीएसचा पर्याय निवडलेल्या कर्मचाऱ्यांना एकदाच पुन्हा एनपीएसमध्ये येता येईल. पण निवृत्तीच्या किमान १ वर्ष आधी हा पर्याय निवडावा लागेल.

<><><><>

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षांदरम्यान उमेदवारांची एआय आधारित चेहऱ्याची पडताळणी करण्यासाठीचा प्रायोगिक कार्यक्रम यूपीएससीनं नुकताच राबवला.

उमेदवारांच्या चेहऱ्याची छायाचित्रं आणि त्यांच्या नोंदणी अर्जांवरची छायाचित्रं पडताळून पाहण्यात आली. या नव्या यंत्रणेमुळे पडताळणीसाठी लागणारा सरासरी वेळ ८ ते १० सेकंद इतका कमी झाला.

**<><><>**

सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरून चालताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार देशाच्या सर्व समावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे. सरकारने शेतीला तंत्रज्ञानाची जोड देत शेतकऱ्यांच्या मेहनतीला नवा आयाम दिला आहे. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड - व्हॉईस कास्ट**

*(कृषी क्षेत्रात सरकारने सुरू केलेलं डिजिटल कृषी अभियान शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर अचूक परिणाम साधत आहे. उपग्रह, सेन्सर्स तसंच मोबाईल ॲप्लिकेशन यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीचं नियोजन, सिंचन पुरवठा आणि पीक संरक्षणाबाबत मार्गदर्शन मिळत आहे. ई-नाम या माध्यमातून देशभरातल्या एक हजारांहून अधिक बाजारपेठा जोडल्या गेल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालासाठी योग्य मोबदला मिळत आहे. अ ॅग्री-स्टॅक अंतर्गत किसान ड्रोन आणि जिओ-टॅग केलेले पीक डेटा शेतकऱ्यांना मातीचं आरोग्य, हवामान आणि कीटक नियंत्रणाबद्दल रिअल टाईम माहिती पुरवत आहे.*

***होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री***

*नमो ड्रोन दीदी उपक्रमाद्वारे, ग्रामीण महिलांना ड्रोन चालवण्याचं, शेतात फवारणी करण्याचं, पिकांचे मॅपिंग करण्याचं आणि कार्यक्षमता सुनिश्चित करण्याचं प्रशिक्षण दिलं जात आहे.)*

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या बालपणाबद्दल सांगणारा ‘चलो जीते है’ हा चित्रपट राज्यभरात विविध चित्रपटगृहांमध्ये दाखवण्यात येत असून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. मुंबई आणि नवी मुंबईतही याचं प्रक्षेपण झालं. ऐकूया एक प्रातिनिधिक प्रतिक्रिया.

***होल्ड... बाईट 3***

**<><><>**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर परिषदेनं नुकत्याच जीएसटी करांमध्ये सुधारणा केल्या. अनेक क्षेत्रांमध्ये दर कमी केल्यामुळे याचा फायदा सर्वसामान्यांना होणार

आहे. व्यावसायिक वस्तुंची वाहतूक करणाऱ्या वाहनांवरचे करही कमी करण्यात आले आहेत. देशातली ६५ ते ७० टक्के मालवाहतूक करणाऱ्या ट्रकसारख्या वाहनांवरचा २८ टक्के कर १८ टक्क्यांवर आणण्यात आला आहे. यामुळे ट्रकसाठी करावा लागणारा आगाऊ भांडवली खर्च आणि प्रतिटनावर होणारा मालवाहतूक खर्चही कमी होतो. यामुळे कृषीसंबंधित सामग्री, सिमेंट, स्टील तसंच ई-कॉमर्स डिलिव्हरी स्वस्तात होऊन, देशातल्या पुरवठा साखळीचा फायदा होणार आहे.

**<><><><>**

युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या तात्पुरत्या यादीत भारतातल्या सात नवीन नैसर्गिक स्थळांचा समावेश करण्यात आला आहे. या नवी स्थळांमध्ये महाराष्ट्रातलं पाचगणी आणि महाबळेश्वर इथलं डेक्कन ट्रॅप्स, कर्नाटकमधलं सेंट मेरीज आयलंड क्लस्टरचा भूगर्भीय प्रदेश, मेघालयातल्या गुहा, नागा हिल ओफिओलाईट, आंध्र प्रदेशातलं एरा मट्टी दिब्बालू, तिरुमला टेकड्या आणि केरळमधल्या वर्कला इथले उंच कडे यांचा समावेश आहे.

पाचगणी आणि महाबळेश्वर इथले डेक्कन ट्रॅप्स ही कोयना अभयारण्याच्या परिसरात जांभा दगडांची वैशिष्ट्यपूर्ण रचना आहे. ही रचना लाव्हारसाच्या ४० पेक्षा जास्त थरांमुळे निर्माण झाली असून दख्खन पठाराचा हा भाग जांभा दगडापासून बनलेल्या जगातल्या सर्वात मोठ्या भूभागांपैकी एक आहे. या समावेशामुळे तात्पुरत्या यादीतल्या भारतीय स्थळांची संख्या ६९ इतकी झाली आहे. यात ४९ सांस्कृतिक वारसा स्थळं, १७ नैसर्गिक आणि ३ मिश्र वारसास्थळांचा समावेश आहे.

**<><><><>**

जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा भालाफेकपटू सचिन यादव यानं उत्तम कामगिरी केली, मात्र त्याचं कांस्यपदक थोडक्यात हुकलं आणि त्याला चौथ्या स्थानावर समाधान मानावं लागलं. ८६ पूर्णांक २७ शतांश मीटर भाला फेकत त्यानं व्यक्तिगत सर्वोत्तम कामगिरी केली. तर दोनवेळा ऑलिम्पिक पदकविजेता नीरज चोप्रा आठव्या स्थानावर राहिला.

**<><><><>**

**राज्य सरकारनं** केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंट इंडिया सोबत आज मुंबईत सामंजस्य करार केला. महाराष्ट्रात विद्यार्थी आणि शिक्षकांची संख्या मोठी असून केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंट इंडिया कडे कौशल्य आहे. दोघांमधील सामंजस्य करार हा राज्यातील शालेय शिक्षणाला जागतिक दर्जा प्राप्त होण्यासाठीचा नवा टप्पा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. या सामंजस्य कराराअंतर्गत शिक्षकांसाठी विषयानुरूप प्रशिक्षण कार्यक्रम, राष्ट्रीय शिक्षण धोरणास अनुरूप आणि सीबीएसई-सुसंगत शैक्षणिक साधनसामग्री, आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्रे तसंच विद्यार्थ्यांसाठी 'क्लायमेट क्वेस्ट' सारखा हवामान शिक्षण कार्यक्रम आणि पूर्व-प्राथमिक अभ्यासक्रम केंब्रिज उपलब्ध करून देणार आहे. याशिवाय डिजिटल साक्षरता, आयसीटी आधारित शिक्षण, जीवनकौशल्ये व मूल्यशिक्षणाशी संबधित अभ्यासक्रमही राज्यातील शाळामध्ये राबवले जातील.

**<><><><>**

आगामी बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आज पाटणा इथं भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी बिहार विधानसभा निवडणुकीशी संबंधित बाबींवर चर्चा केली.

**//<><><><>//**